# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक – ३६८/२०२४ दिनांक ०३/१०/२०२४

## प्रेस नोट

### " Credit card द्वारे ऑनलाईन झालेली १,५५,१९५/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश "

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नवघर परीसरात राहणा-या श्री. राणे यांना त्यांचे मोबाईलवर ऑनलाईन खरेदी करण्याबाबत लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी प्राप्त लिंकवर क्लिक केले असता ऑनलाईन खरेदी करण्याकरीता क्रेडिट कार्डची माहिती भरण्याकरीता नमुद केले होते. तक्रारदार यांना क्रेडिट कार्डच्या खात्यातुन १,५५,१९५/- रु कपात झाल्याचा मॅसेज प्राप्त झाला. तक्रारदार यांचे फसवणुकीबाबत सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार प्राप्त झाल्याने सदरबाबत नोंद घेण्यात आली.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक – २०६३-बी/२०२४ दि. ०२/१०/२०२४)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम ऑनलाईन शॉपिंग ई-कॉमर्स साईट Flipkart यावर जमा झाल्याचे दिसुन आले. त्यावर संबंधीतांना तात्काळ पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम गोठवून त्यांचे खात्यात परत करण्याबाबत कळविण्यात आले. अशाप्रकारे तक्रारदार यांचे तक्रारीबाबत तात्काळ पाठपुरावा करुन **फसवणुक झालेली १,५५,१९५/- रु रक्कम खात्यात परत करण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डची माहिती कोणासही उघड करु नये.**
- **अनोळखी लिंकवर क्लिक करु नये .**
- **मोबाईलमध्ये कोणतेही अनोळखी ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये, तसेच आपले मोबाईलमधील ॲप्लीकेशनची पडताळणी करावी.**
- **बँकेकडून बँक खातेधारकाला कोणतीही वैयक्तीक माहिती (KYC करीता) विचारली जात नाही.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **फसव्या एमएसएसला, कॉल प्रतिसाद देवू नका.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस**

**ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, पोअं/राहुल बन, पोअं/कुणाल सावळे, पोअं/ शुभम कांबळे,यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

----000----